| Publication | Edition | Date | Page |
|---|---|---|---|
| Divya Marathi | Nashik | 19 June 2014 | - |

मुंबई,गुरुवार, दि. १९ जून २०१४

# विकास बहुद्देशीय संस्थेकडून पन्नास युवकांना मिळाला रोजगार



येवला, दि.१८ : जिल्ह्यातील संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ व टेक्सटेंड इंटरनॅशनल कंपनी व येथील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था तसेच नेहरू युवा केंद्र संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत प्रशिक्षण रोजगार मेळावा, येथील विकास टेक्निकल इस्टिट्यूटमध्ये स्वयंरोजगार मार्गदर्शन व प्रमाणपत्र वाटप कार्यक्रम झाला.

या मेळाव्यात पन्नास बेरोजगार युवकांना या विकास टेक्निकलने रोजगार मिळवून दिला. संगीता पराते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. जिल्हा व्यवस्थापिका म्हणून संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळावर आहेत. 'एटीडीसी'चे प्राचार्य विशाल चित्रांश यांनी 'एटीडीसी' चे भारतात होणारे वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम व त्याचा लाभ उमेदवारांना कशा प्रकारे घेता येईल, याची माहिती दिली. तर विकास टेक्निकल इन्स्टीट्यूटचे संचालक अझर शाह यांनी या सर्व योजनेसंदर्भातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

तसेच शासनाच्या कल्याणकारी योजना व अर्थसाह्य कर्जप्रणाली व त्यावर मिळणारे अनुदानाची माहिती दिली. प्रमुख पाहुणे प्रदिप सोनवणे, नेहरू युवा केंद्राचे अतुल निकम, पंचायती समिती येवला उपसभापती प्रकाश वाघ, विशाल चित्रांश व टेक्सटेंड कंपनीचे आलम अन्सारी उपस्थित होते.

| Publication | Edition | Date | Page |
|---|---|---|---|
| Divya Marathi | Nashik | 26 June 2014 | - |

सिटी ऑ

घे भरारी | महिलांच्या फॅशन डिझाइन प्रशिक्षणाचा समारोप

# 'महिलांच्या कार्याला दिशा देण्याची गरज'



प्रतिनिधी | नाशिक

शिवणकाम हा व्यवसाय मुळात महिला वर्गाचा पण त्याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले आहे. केंद्राने सुरू केलेल्या कापड उद्योगाचे एकिकृत कौशल्य विकास योजनेंतर्गत महिलांना मोफत प्रशिक्षण दिले जाते, पण त्याचा लाभ घेतला जात नाही. सध्या महिलांना उद्योजक होण्याची इच्छा आहे, जिद्द आहे पण त्यांना दिशा देण्याची गरज जयराज इन्पेक्सचे संचालक जयराम दियालाणी यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ यांच्या वतीने फॅशन डिझाइन प्रशिक्षणच्या समारोप कार्यक्रमात दियालाणी बोलत होते. या वेळी प्रशिक्षणार्थी महिलांना महापौर ॲड. यतिन वाघ, आमदार वसंत गिते, स्थायी समिती सभापती रमेश धोंगडे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. या वेळी दियालाणी म्हणाले की, शहर मेट्रो सिटीकडे वळत असल्याने कापड व्यवसायात चांगल्या संधी आहे. त्यामुळे महिलांनी फॅशन डिझाइनसारख्या कोर्सचे प्रशिक्षण घेऊन रोजगार प्राप्त केला पाहिजे. या वेळी आमदार वसंत गिते म्हणाले की, फॅशन डिझाइन प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना रोजगार मिळेल म्हणून यासाठी जागा उपलब्ध करून दिली. सध्या रविवार कारंजा येथील महापालिका इमारतीमधील जागा अपुरी पडत असल्याने पहिल्या मजल्यावरील हॉलसाठीही महापालिकेकडून मान्यता घेणार असल्याचे या वेळी सांगितले.

## अत्याधुनिक यंत्रांवर प्रशिक्षण

महिलांसाठी केंद्राने सुरू केलेले हे विनामुल्य प्रशिक्षण आहे. महिलांना अत्याधुनिक यंत्रावर प्रशिक्षण दिले जात असल्याने भविष्यात महिलांना कोणत्याही यंत्रावर काम करणे सोपे जाईल. नोकरी करण्यासाठी किंवा खासगी व्यवसायासाठी या प्रमाणपत्राचा उपयोग होणार आहे.

**विशाल चित्रांश**, प्रकल्पप्रमुख